# प्रेसनोट

जा.क्र. ५७३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–१६/०९/२०१६

दिनांक १५/०९/२०१६ रोजी अनंत चर्तुदशी निमीत्त भंडारा शहरात बहुतांश सार्वजनीक गणेश मंडळाच्या श्री. मुर्तीचे तसेच घरघुती गणरायाचे विर्सजन होत आहेत. त्या दुष्टीकोनातुन बंदोबस्त लावण्यात आला. शहरात एकुण २३ गणेश सार्वजनीक विसर्जन व खाजगी विसर्जन एकुण २८० वैनगंगा नदी, मिस्किन टॅन्क, खामतलाव, सागर तलाव, पिंगलाई बोडी, तसेच ग्रामीण भागात लगतच्या गाव तलावात विर्सजन होत आहेत. विर्सर्जनाची प्रकिया शांततेत पार पडावी तसेच कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये. याकरीता मा. पोलीस अधीक्षक विनीता साहू यांनी विर्सजना स्थळी प्रत्यक्ष भेट देवुन संदर्भात करावयाचे उपाय योजना याबाबत मार्गदर्शक सुचना देण्यात आल्या आहेत. व बंदोबस्त करीता गांधी चौक, जलाराम चौक, शास्त्री चौक, खामतलाव चौक, राजीव गांधी चौक, जिल्हा परीषद चौक, चांदणी चौक, पोस्ट ऑफीस चौक, मिस्किन टॅन्क, इ. ठिकाणी फिक्स पाईन्ट बंदोबस्त आवण्यात आले.

या दरम्यान मा. पोलीस अधीक्षक विनीता साहू यांनी वैनगंगा नदी घाटावर जावुन तेथील आजुबाजुच्या परीसराची पाहणी केली. मा. जिल्हाधिकारी श्री. डॉ अभिजीत चौधरी साहेब भंडारा यांनी नदीकाठावर पाहणी करुन विसर्जन स्थळी बोट, होडया, लाईफ जॅकेट्स, दोर, हवा भरलेला टयुब, यांची व्यवस्था करण्यात आली आहे. सदर नदी घटावर गणपती विर्सजन मोठया प्रमाणात केले जात आहे. त्याकरीता पोलीस बंदोबस्त मोठया संख्येने लावलेला आहे. तसेच कोणताही अनुचीत प्रकार घडणार नाही. याची दक्षता घेण्यासाठी पोलीस बंदोबस्त यांना सर्तक राहण्याचे आदेश दिले.

सदर मिरवणुकी दरम्यान गणेश उत्सव मंडळाना सांगण्यात आले की **GIVE WAY TO AMBUANCE** अशी माहीती देवुन गणेश मंडळांना सुचविण्यात आले. दिनांक १५/०९/२०१६ चे गणेशउत्सव विसर्जन शांततेत पार पाडला.

(श्री.पी.पी. कोलवाडकर)
प्रभारी पोलीस अधिकारी करीता
भंडारा.
दुरध्वनी.क्र.९४२३११९२९०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.
**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.